महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे
विभागीय मंडळ, पुणे.४११००५

MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY & HIGHER SECONDARY EDUCATION, PUNE.411005

| DIVISIONAL CHAIRMAN | DIVISIONAL SECRETARY | E-MAIL - |
|---|---|---|
| 25536722 (OFFICE) | 25536781/82/83, 25536712 (OFFICE) | sscboardpune@gmail.com |


क्रमांक: पुविंम/शाखा/डीपी/ 447
पुणे :- ४११ ००५
दिनांक :- 19/01/2026

प्रति,
सर्व मुख्याध्यापक / प्राचार्य
शाळा / कनिष्ठ महाविद्यालय
जिल्हा पुणे, अहिल्यानगर व सोलापूर

**विषय :-** उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) फेब्रुवारी - मार्च २०२६ परीक्षेसाठी कॉपी मुक्त अभियानाअंतर्गत **दि. १९ जानेवारी ते २६ जानेवारी २०२६ या कालावधीत जनजागृती सप्ताह आयोजित करणेबाबत...**

उपरोक्त विषयाबाबत आपणांस कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात येणारी उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) दि. १०/०२/२०२६ ते दि. १८/०३/२०२६ माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (इ. १० वी) दि. २०/०२/२०२६ ते १८/०३/२०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आली आहे.

सदर दोन्ही परीक्षांना राज्यातून सुमारे ३१ लाख विद्यार्थी प्रविष्ठ होणार असून सदर परीक्षेत विविध मार्गानी निष्पन्न होणाऱ्या गैरप्रकाराचा मंडळाला सातत्याने सामना करावा लागतो. त्याअनुषंगाने फेब्रुवारी-मार्च २०२६ च्या इ. १० वी व इ. १२ वी परीक्षेचे वेळी राज्यातील सर्व माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये दि. १९ जानेवारी ते २६ जानेवारी २०२६ या कालावधीत कॉपीमुक्त अभियानाअंतर्गत जनजागृती सप्ताह आयोजित करण्याबाबत राज्य मंडळ कार्यालयाने कळविले आहे. त्याअनुषंगाने आपल्या शाळा / कनिष्ठ महाविद्यालयामध्ये कॉपीमुक्त अभियानाअंतर्गत जनजागृती सप्ताहाचे आयोजन करावे. व गैरमार्गाचा अवलंब करणार नाही याबाबत शपथ घ्यावी. शपथ मसुदा या पत्रासोबत देण्यात येत आहे.

MBRaut
( डॉ.मिनाक्षी राऊत )
विभागीय सचिव,
पुणे विभागीय मंडळ,
पुणे-४११ ००५.

## माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) परीक्षा फेब्रुवारी–मार्च २०२६

## !! कॉपीमुक्त अभियानाअंतर्गत जनजागृती सप्ताह !!

### (कालावधी–सोमवार दिनांक १९ जानेवारी २०२६ ते सोमवार दिनांक २६ जानेवारी २०२६)

| अ.क्र. | दिनांक | करावयाच्या कार्यवाहीचा तपशील |
|---|---|---|
| १ | सोमवार<br>दि.१९/०१/२०२६ | स्थानिक लोकप्रतिनिधी, शाळा विकास व व्यवस्थापन समिती सदस्य, गावातील प्रतिष्ठित नागरिक व माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाचे मुख्याध्यापक व प्राचार्य, शिक्षक यांना संयुक्त सभेमध्ये कॉपीमुक्त अभियानाची शाळा पातळीवर अंमलबजावणी करणेबाबत प्राचार्य व मुख्याध्यापक यांनी माहिती देणे. |
| २ | मंगळवार<br>दि.२०/०१/२०२६ | कॉपीमुक्त अभियानाची शपथ सर्व शाळा/कनिष्ठ महाविद्यालयामध्ये परिपाठाचे वेळी घेणे. (सोबत शपथेचा नमूना जोडला आहे.) |
| ३ | बुधवार<br>दि. २१/०१/२०२६ | शाळा स्तरावर मंडळ शिक्षासूचीचे वाचन करणे, मंडळाच्या उत्तरपत्रिकेच्या मुखपृष्ठाच्या मागील बाजूस असलेल्या सूचना, व प्रवेश पत्रावरील (Hall Ticket) सूचनांचे वाचन करणे. गैरमार्ग केल्यास होणाऱ्या परिणामांची जाणीव करून देणे. |
| ४ | गुरूवार<br>दि.२२/०१/२०२६ | परीक्षा काळात विद्यार्थ्यांनी घ्यावयाचा आहार व आरोग्याची काळजी याबाबत तज्ज्ञांमार्फत शाळा/कनिष्ठ महाविद्यालयामध्ये पालक व विद्यार्थ्यांना उद्बोधन करणे. |
| ५ | शुक्रवार<br>दि.२३/०१/२०२६ | परीक्षेला सामोरे जाताना अभ्यासाची तयारी, परीक्षा तणावमुक्त वातावरणात कशी देता येईल, उत्तरपत्रिका कशा प्रकारे लिहाव्यात याबाबत तज्ज्ञांमार्फत मार्गदर्शन करणे. तसेच राज्य मंडळामार्फत तयार केलेली चित्रफीत विद्यार्थ्यांना दाखविणे. |
| ६ | शनिवार<br>दि.२४/०१/२०२६ | कॉपीमुक्त अभियानाच्या जागृतीसाठी कॉपीमुक्ती घोषवाक्यासह शाळा परिसरात जनजागृती फेरी काढणे. |
| ७ | सोमवार<br>दि.२६/०१/२०२६ | ग्रामसभा बैठकीमध्ये मुख्याध्यापक/शिक्षक यांनी कॉपीमुक्त अभियानासंदर्भात वरील विषयांबाबत माहिती देणे व याबाबत जनजागृती करणे व कॉपीमुक्त वातावरणात परीक्षा पार पाडण्यासाठी ग्रामस्थांना आवाहन करणे. विद्यार्थी, पालक, शिक्षक व ग्रामस्थ यांनी शपथ घेणे. |

(डॉ. दिपक माळी)
सचिव
राज्य मंडळ, पुणे–०४.

## विद्यार्थ्यांनी घ्यावयाची शपथ

मी शपथ घेतो की, मी फेब्रुवारी–मार्च २०२६ च्या इ. १० वी व इ. १२ वी परीक्षेस परिपूर्ण अभ्यास करूनच सामोरे जाईन. मी उत्तीर्ण होण्यासाठी परीक्षेत कोणत्याही गैरमार्गाचा अवलंब करणार नाही किंवा परीक्षेपूर्वी गैरमार्गाचा विचारही करणार नाही.

जर कोणी गैरमार्गाचा विचार करत असेल तर त्यास गैरमार्गापासून परावृत्त करेन. परीक्षेला सामोरे जाताना मंडळ सूचनांचे व नियमांचे काटेकोरपणे पालन करेन. मी सातत्याने अभ्यास करेन व प्रश्नपत्रिका सोडविण्याचा सराव करेन. तसेच परीक्षेस आत्मविश्वासाने, निर्भिडपणे, तणावविरहित सामोरे जाईन व चांगल्या गुणाने उत्तीर्ण होऊन माझ्या शाळेचे, आई वडीलांचे व गुरूजनांचे नाव उज्ज्वल करेन.

**जय हिंद!–जय महाराष्ट्र!**

‘ब’

## २६ जानेवारी, २०२६ रोजीच्या प्रजासत्ताकदिनी ध्वजारोहणाच्या कार्यक्रमात विद्यार्थी, पालक, शिक्षक व ग्रामस्थ यांनी प्रत्येक शाळेमध्ये घ्यावयाची

## शपथ

आम्ही सर्व नागरीक गांभीर्यपूर्वक शपथ घेतो की, आपल्या गावात इ. १०वी व इ. १२ वी च्या परीक्षेदरम्यान कॉपी किंवा इतर कोणताही गैरप्रकार होऊ देणार नाही. सर्व विद्यार्थ्यांना कॉपी करण्यापासून परावृत्त करू. यासाठी परीक्षेदरम्यान आम्ही जागरूक राहून मंडळाच्या कॉपीमुक्त अभियानात सक्रिय राहू. मंडळाचे कॉपीमुक्त अभियान यशस्वी करून आपले गाव कॉपीमुक्त करू. तसेच शिक्षणक्षेत्रातील या अपप्रवृत्तींना कायमचा आळा घालू.

जय हिंद! जय महाराष्ट्र!

‘क’

## २६ जानेवारी, २०२६ रोजीच्या प्रजासत्ताकदिनी तहसील स्तरावरील शासकीय ध्वजारोहणाच्या कार्यक्रमाचे वेळी घ्यावयाची शपथ

आम्ही सर्व नागरीक गांभीर्यपूर्वक शपथ घेतो की, इ. १०वी व इ. १२ वी च्या परीक्षेदरम्यान कॉपी किंवा इतर कोणताही गैरप्रकार होऊ देणार नाही. विद्यार्थ्यांना कॉपी करण्यापासून परावृत्त करू. राज्य मंडळाच्या कॉपीमुक्त अभियानामध्ये सक्रिय सहभागी होऊन, आपला जिल्हा कॉपीमुक्त करू. तसेच शिक्षणक्षेत्रातील या व अशा अपप्रवृत्तींना कायमचा आळा घालू.

जय हिंद! जय महाराष्ट्र!

'ड'

## २६ जानेवारी, २०२६ रोजीच्या प्रजासत्ताकदिनी जिल्हास्तरावरील मध्यवर्ती शासकीय कार्यक्रमामध्ये ध्वजारोहणाच्या कार्यक्रमाचे वेळी घ्यावयाची शपथ

आम्ही सर्व नागरीक गांभीर्यपूर्वक शपथ घेतो की, इ. १०वी व इ. १२ वी च्या परीक्षेदरम्यान कॉपी किंवा इतर कोणताही गैरप्रकार होऊ देणार नाही. विद्यार्थ्यांना कॉपी करण्यापासून परावृत्त करू. राज्य मंडळाच्या कॉपीमुक्त अभियानामध्ये सक्रिय सहभागी होऊन, आपला जिल्हा कॉपीमुक्त करू. तसेच शिक्षणक्षेत्रातील या व अशा अपप्रवृत्तींना कायमचा आळा घालू.

जय हिंद! जय महाराष्ट्र!